## (वृत्त-उपेंद्रवजा)

विदर्भ देशीं शिवग्राम मोठें। विराजती सद्गुरुनाथ जेथें॥

कृपासुधा शांत करी जिवाला। नमू हृदीं नित्य गजाननाला॥ १ ॥

मला असें छत्र तुझ्या कृपेचे। जगीं न कोणीहि असें जिवाचें॥

पदीं तुझ्या आश्रय दे नताला। नमूं दयासिंधु गजाननाला॥ २ ॥

सहा रिपू हे मज त्रास देती। गती न होई परमार्थ पंथीं॥

सहाय्य दे दीन अजाण बाला। नमूं गुणाधीश गजाननाला॥ ३ ॥

भवीं बुडालों दिन व्यर्थ गेले। बघून ऐसें मन दग्ध झालें॥

करास देई शरणागताला। नमूं जगबंधू गजाननाला॥ ४ ॥

गजानना मंगलधाम देवा। मदंतरी ज्ञानप्रदीप लावा॥

कृतार्थ मूढास करा दयाळा। नमूं जगत्स्वामी गजाननाला॥ ५ ॥

अघास गंगा, विधु ताप नाशी। दरिद्रता कल्पतरुहि ध्वंसी॥

त्रयीं हि त्वदर्शनी ने लयाला। तुला तुळा केवि गजाननाला॥ ६ ॥

तुलाच गाती श्रुती साम गानें। सहाही शास्त्रे, अठरा पुराणें॥

त्रिमुर्ती येई जन तारण्याला। नमो महासाधु गजाननाला॥ ७ ॥

मनांत नांदो तव ज्ञानमुर्ती। भजावया दे जन चित्ती स्फुर्ति॥

पदाब्जि दे ठाव मला कृपाळा। नमुं जगदंद्य गजाननाला॥ ८ ॥

(टिप :- यापुढे भाग पहिला यातील श्लोक, प्रदक्षिणा, क्षमापण हे येथे म्हणण्यात यावे.)